दीर्घकालपर्यंत, भारतातील विकास योजना ग्रामीण भागावर केन्द्रीभूत होत्या. कम्युनिटी एड ॲन्ड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम (सीएएसपी) (समाजासाठी मदत व पुरस्कृत कार्यक्रम), ही संस्था १९७५मध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रख्यात समाज शास्त्रज्ञ असलेले डॉ. एस. डी. (शरच्चंद्र) गोखले, यांनी स्थापन केली. विकास प्रक्रियेतील नागरी भागांचे महत्त्व उमजून घेणारी ही पहिली संस्था होती आणि पारंपरिक ग्रामीण भागातील कार्यक्रमांबरोबरच या संस्थेने नागरी विभागांवरही लक्ष केन्द्रीत केले. अशा रीतीने, सीएएसपीने तीन दशकांहून अधिक काळ मुंबईसह, नागरी विभागांत काम केले आहे.

गरीब, सुखसोयींपासून वंचित मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करता यावा यासाठी आवश्यक त्या संधी देण्याच्या गरजेवर सीएएसपी लक्ष पुरविते. यासाठीच्या कार्यपद्धतीत, जीवनाचा दर्जा उंचावण्यास पोषक असे वातावरण निर्माण होणे समाविष्ट आहे. सहभाग आणि प्रचार यांतून मुले, कुटुंबे आणि समाज यांच्या क्षमता वाढविण्याच्या साधनांमार्फत, सीएएसपी हे साध्य करण्याचा प्रयत्न करते.

# नागरी विकास– (बिगर शासकीय)

— प्रमोद काळे


छायाचित्राचे श्रेय : निखत शेख

# स्वयंसेवी संस्थांचा हस्तक्षेप

पूर्वीच्या काळात, सीएएसपी, समाजातील स्थानिकांना फायदे मिळवून द्यायची; कपडे, आणि शैक्षणिक सामग्री वगैरे व्यतिरिक्त घरे बांधणीसाठी सामग्री, जेव्हापासून सरकारने शहर पुनर्बांधणीसाठी निधीची तरतूद करायला सुरूवात केली तेव्हा गरजा बदलल्या आणि आता अशा प्रकारच्या सामग्रीच्या मदतीची गरज दिसून येत नाही.या बदलाचा फायदा समाजांना घेता यावा म्हणून सीएएसपीने आता त्यासाठीची कौशल्ये समाजांना देण्यावर लक्ष केन्द्रीत केले आहे. नागरी समाजामध्ये सीएएसपी जी विशिष्ट कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न करत आहे, ती सरकारी व्यवस्थापनामध्ये आणि मुक्त, जागतिकरण झालेल्या अर्थव्यवस्थेतही आवश्यक ठरणारी आहेत. या उद्दिष्टपूर्तीकडे जाण्यासाठी सीएएसपी मुंबई, दिल्ली आणि पुणे येथे १९७५ पासून काम करत आहे.

मुंबईमधील सीएएसपीच्या कार्यक्रमाची वर्गवारी दोन मोठ्या विभागांमध्ये करता येईल. पहिला, आता पाच वर्षांहून अधिक काळ मुंबईतील तीन ठिकाणी कार्यान्वित होत असलेला कौशल्य विकास कार्यक्रम.

सुरूवातीपासून या कार्यक्रमाला एल ॲन्ड टी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने मदत केली आहे आणि नोकरी मिळविण्याची किंवा व्यवसाय स्थापनेची क्षमता प्राप्त व्हावी याची तरतूद केली आहे. आजपर्यंत वंचित पार्श्वभूमीवरील १८०० हून अधिक लोकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. कंप्युटर ऑपरेटर्स (संगणक) चा अभ्यासक्रम डेटा एन्ट्री (माहिती भरणे) मधील कामासाठी आवश्यक ती कौशल्ये मिळवून देतो, तसेच, अर्ज, प्रतीज्ञापत्र, शाळा आणि महाविद्यालयांचे प्रकल्प व इतर गरजा यांसाठी आवश्यक ते कागदपत्र टंकलिखित करून देणारे उद्योग चालू करण्यासाठी त्यांची तयारी करून घेतो.

महिलांसाठी अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करून देणे हा हाती घेण्याच्या कार्यक्रमांत प्रमुख मानला गेला आहे, असे जाणवून आले की महिला त्यांच्या घरातून करू शकतील आणि महिलांनाच उपयोगी ठरू शकतील आणि जो व्यवसाय फक्त महिलांसाठीच चालविला जाईल अशा व्यवसायांच्या योजना केल्या पाहिजेत म्हणजे त्यांच्या व्यवसायाच्या स्वीकारामध्ये कमीतकमी अडथळे येतील. या उद्दिष्टाने सातशेहून अधिक महिलांना ब्युटिशियन (सौंदर्यवर्धनाचे काम) म्हणून प्रशिक्षित करण्यात आले. काहीजणींना ब्युटिपार्लर्समध्ये काम मिळाले आहे; यातील काही ब्युटिपार्लर्स उच्चभ्रू ठिकाणी आहेत आणि त्यामधील





एक चित्रनगरीत आहे जिथे आमची एक विद्यार्थिनी काम करते आहे. आमच्या प्रशिक्षणार्थींपैकी बऱ्याच महिला आता त्यांचा व्यवसाय त्यांच्या झोपडपट्टीतील घरांतच चालवितात आणि त्यांच्या शेजारातल्या महिलांना सेवा पुरवितात. स्वत:च्या व्यक्तिमत्वाची काळजी घेण्यासाठी खर्च करण्याची महिलांची तयारी असते याचा हा पुरावा आहे असे आम्ही मानतो आणि सौंदर्यप्रसाधन व्यवसाय ही एक व्यावसायिक संधी म्हणून आम्ही ओळखली यावर हे यावरून स्पष्ट होते.

व्यावसायिक प्रशिक्षणाचा तिसरा विभाग आहे शिवणकामाचा; येथे महिलांना दैनंदिन वापराच्या कपड्यांचे, जसे पोलके,परकर आणि मुलांचे कपडे कात्रण आणि शिवणे ही कौशल्ये शिकविली जातात. साडीला 'फॉल' लावणे व तिच्या कडेला 'पिको' करणे यासाठी मशीनच्या वापरामध्येही प्रशिक्षित केले जाते. यापैकी काही महिलांना शिंप्यांच्या दुकानात किंवा इतर समान आस्थापनात काम मिळते. येथेही, बऱ्याच मोठ्या प्रमाणात महिला त्यांच्या वस्तीतील महिलांसाठी हे काम घरबसल्या करतात. गेल्या वर्षी आमच्याकडून शिकून बाहेर पडलेल्या महिलांच्याच मागणीवरून आम्ही एक शिवण/फॅशन नमुन्यांचा प्रगत अभ्यासक्रम चालू केला आणि या महिलांना अगोदरच येत असलेल्या साध्या कपड्यांचे महत्त्व वाढविणाऱ्या जसे, चुण्या पाडणे, कापडाला चिमटे घेऊन नमुना तयार करणे अशा कौशल्यांचे प्रशिक्षण दिले. यामुळे त्यांच्या वेतनात भरपूर वाढ होऊन त्यांच्या अर्थाजन क्षमतेत घसघशीत भर पडली. या प्रगत प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ सहासष्ट महिलांनी घेतला. सध्या आमच्या वेगवेगळ्या केन्द्रांवर इतर १७५ व्यक्ती प्रशिक्षण घेत आहेत आणि अधिक ठिकाणी प्रशिक्षण दिले जावे यासाठी आमची क्षमता वाढवावी अशी सततची मागणी आहे.थोडक्यात काय, मुंबईतील अत्यंत गरीब आणि दुर्लक्षित भागांतील असंख्य रहिवाशांसाठी सीएएसपी यशस्वीरीत्या अर्थाजन वाढविण्याच्या संधी निर्माण करत आहे.

सीएएसपीच्या कार्यक्रमाचा दुसरा भाग आहे, दुरावलेल्या समाजांमधील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांच्याबरोबर काम करणे. मुलांखेरीज, सीएएसपीने वृद्धांचा गट निवडला आहे ज्यांच्याकडे लक्ष देणे जरूरीचे आहे. नागरी विभागांत ज्येष्ठ नागरीकांचे प्रमाण लोकसंख्येत अधिक असते. अगदी अलीकडच्या काळापर्यंत अनेक विकासकार्य करणाऱ्या संस्थांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. घरांमधील अपुरी जागा आणि





घरबसल्या अर्थार्जन करण्याच्या संधींची अनुपलब्धता यामुळे हे ज्येष्ठ नागरीक घराच्या बाहेर रस्त्यावर हरवल्यासारखे बसून असतात. याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो आणि पुढे जाऊन त्यांच्या शारीरिक दुखण्यात होतो; या दुखण्याचे निदान आणि त्यावर उपचार नेहमीच होतात असे नाही. बागा, मोकळ्या जागा यांचा अभाव, देवळांचे आणि इतर धार्मिक आस्थापनांचे संकुचित आकार यामुळे ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध असलेल्या पर्यायांवर मर्यादा येते.

कुटुंबे आणि समाज यांच्याबरोबर करावयाच्या कामाचा भाग म्हणून सीएएसपी मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी तीन ज्येष्ठ नागरीक केन्द्रे चालविते; ज्येष्ठ नागरीक येथे एकत्र जमतात, विचारांची देवाणघेवाण करतात, योगाच्या वर्गात सहभागी होतात, रोजच्या बातम्यांवर चर्चा करतात. समाजाच्या विविध समस्या उचलून धरण्यासाठी राजकीय आाणि अधिकाऱ्यांच्या आस्थापनांशी चर्चा करेल असा दबाव गट या ज्येष्ठ नागरिकांच्या विभागातून तयार करण्याची प्रक्रिया सीएएसपीने, अलीकडेच चालू केली आहे.या हेतूने, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि पाणी पुरवठा यांच्याशी संबंधित समस्या त्यांच्या त्यांच्या विभागांत उचलून धरण्यासाठी आम्ही प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर विचारविनिमय व पाठपुरावा करणारा गट तयार करण्याच्या मार्गावर आहोत.

संपूर्ण समाजाबरोबर काम करणे हे एक फार मोठे आव्हान आहे, त्यासाठी वेगवेगळ्या बाबतीत रस असणारे आणि वेगवेगळ्या गरजा असणाऱ्या अनेक विभागांची आणि स्तरांची त्यासाठी आवश्यकता असते. अशी एक संधी २०११ मध्ये मिळाली; एल ॲन्ड टीच्या पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टने सीएएसपी बरोबर जोडून घेऊन पवईच्या फिल्टरपाडा विभागात निरोगी, आनंदी आणि सुसंवादी समाज निर्माण करण्याचे काम सुरू केले. सुरुवातीच्या सर्वेक्षणात आढळून आले की समाजात असंख्य समस्या आहेत, जसे रहिवासी लोकांची दाटीवाटी, पुरेशा पाणी पुरवठ्याचा अभाव आणि महानगरपालिका आणि इतर संस्था पुरवित असलेल्या अनेक आरोग्य सवांमधील तत्पतेचा अभाव. या तत्परतेच्या अभावाचे मूळ कारण म्हणजे जाणीवेचा अभाव आणि समाजजाणीवेचा अभाव यांचा परिणाम आहे हे आम्ही चांगले समजून घेतले. आमच्या हेही लक्षात आले की आमच्या बरोबर काम करण्यासाठी समाजाने पुढे यायचे तर दृश्य फायद्याचा काही 'गळ' लावणे गरजेचे आहे.





यासाठी, विविध समस्यांबाबत जाणीव निर्माण करण्याचे काम सीएएसपीने हाती घेतले; या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी जे रहिवाशी त्यांचा वेळ देऊ शकत होते त्यांना संघटित केले. लोकांना आरोग्य सेवा देऊ करणे आणि कौशल्यांचा विकास हे 'गळ' तयार करण्याच्या कृतीचे प्रमुख भाग म्हणून निवडले गेले. कौशल्य विकास कार्यक्रमात व्यावसायिक प्रशिक्षण केन्द्राने रहिवाशांना अर्थार्जनासाठी अधिक संधी दिल्याच्या परिणामामुळे रहिवाशांना दृश्य फायदे पुरविले गेले. आठवड्यातून एक वेळा भरणारे केन्द्र, अनेकविध आरोग्य समस्यांसाठीच्या उपचारांच्या सेवेबरोबरच, गरोदर महिलांची प्रसुतीपूर्व काळजी घेते.

समाजाला सुसंघटित करण्यासाठी, जाणीव वाढविण्यासाठी आणि वर्तनात आवश्यक तो बदल घडवून आणण्यासाठी अनेक पद्धती अवलंबिल्या गेल्या. समाज आरोग्य सेवकांच्या नेमणुका करून, आरोग्य केन्द्रासाठी संभाव्य लाभार्थी हुडकून काढण्याचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले, महिला प्रसुतीपूर्व आणि प्रसुतीनंतरच्या सेवांचा लाभ घेतील याची खबरदारी घेण्याचेही काम त्यांना देण्यात आले. मुलांमधील हगवण आणि श्वसनसंसर्ग यांसारख्या सर्वसाधारण रोगांचे निदान आणि त्यांवर उपचार लवकर होण्याचे महत्त्व यांविषयी लोकांना पुरेशी माहिती आहे याची खात्री व्हावी म्हणून सभा आणि जाणीव निर्माण करणारी सत्रे वारंवार घेतली जातात. पर्यावरणीय आरोग्य सुधारण्यासाठी आणि पिण्यासाठी सुरक्षित पाण्याचा योग्य साठा करण्यासाठी चळवळीही उभारल्या गेल्या.

समाजाशी आमच्या बांधिलकीमधील दुरवर भागापर्यंत पोहोचण्यासाठी या उपायांची मदत झाली; त्याचा परिणाम म्हणून असंख्य व्यक्ती ज्या त्यांचा वेळ व ऊर्जा देऊ शकतात त्या आता पुढे येऊन आम्हाला आमच्या उपक्रमात मदत करीत आहेत. आता आम्ही समाज कृती गट निर्माण करण्याच्या मार्गावर आहोत, हे कृती गट या प्रक्रियेत स्थानिक पुढाकार घेऊन आस्थापनांबरोबर काम करून त्यांचे हक्क आणि अधिकार यांच्या परिपूर्ततेची मागणी करतील. परंतु या प्रक्रियेला राजकीय रंग चढण्याचा धोका आहे आणि आपल्याच कार्यक्रमाचा हेका धरणाऱ्या गटांपासून दूर राहाणे हेही एक आव्हान आहे. तरीही आम्हाला विश्वास आहे की ज्या व्यक्तींचे खात्रीलायकरीत्या, राजकारण्यांशी पूर्वीचे काही लागेबांधे नाहीत त्यांना जर आम्ही मदत केली तर आम्ही सामान्य लोकांच्या अत्यंत गरीब आणि अत्यल्प प्रातिनिधित्व





असलेल्या गटांच्या गरजांना पुरेशा समानतेने, न्याय्य रीत्या तोंड देऊ शकू.

यापुढील काळात, अशी अपेक्षा आहे की सीएएसपीचा हा उपक्रम, विलगिकरण झालेल्या  नागरी रहिवाशांच्या नागरी अर्थकारण आणि व्यवस्थापन यांबाबतच्या क्षमतांमध्ये बदल घडवून आणेल. याचा परिणाम, फिरून मुलांच्या विकासात वाढ करेल आणि आपल्याला अधिक न्याय्य, चांगल्या आणि समान भारताकडे घेऊन जाईल. आमच्या स्वप्नातील या भारतात सर्व मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्णपणे विकास करणे खरोखरच शक्य होईल.

